# इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

ता.वाळवा, जि.सांगली. पिन कोड नं.४१५४०९
कार्यालय (०२३४२)२२२०२३, २२१२२२ टोल फ्री १८००-२३३-२३७९
Website : mcn-islampur.in E-Mail : meislampur@gmail.com

जा.क्र.इनपा सा.प्र./कावि/५१२९ /2024 दिनांक :25/11/2024

:कार्यालयीन आदेश:

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी PIL No.155/2011 मध्ये दि. 31/01/2017 रोजी निर्णय दिलेला आहे. सदर निर्णयानुसार नगरपरिषद हद्दीमध्ये अनधिकृत आकाश चिन्हे, होर्डिंग, पोस्टर, कमानी, जाहिराती इत्यादी बेकायदेशीरपणे लावली जाणार नाहीत अथवा लावली गेल्यास त्यांचेवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, 1995 मधील तरतूदींनुसार दंड, FIR व निष्कासित करणेच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करणे बंधनकारक करणेत आलेले आहे. सदर कार्यवाही करणेच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे भाग लिपिक, क्षेत्रीय अधिकारी, भरारी पथक, नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी नियुक्ती करणेत येत आहे.

| नोडल अधिकारी | सहायक नोडल अधिकारी |
|---|---|
| श्री.निलेश शिंदे, कर निरीक्षक 8055891180 | श्री.दिलीप कुंभार, लिपिक 9850034694 |

| भाग क्रमांक | क्षेत्रीय भाग लिपिक | क्षेत्रीय अधिकारी | भरारी व निष्कासन पथक |
|---|---|---|---|
| 1<br>2 | श्री.प्रमोद जाधव, लिपिक<br>श्री.तेजस वायदंडे, सहायक | श्री.अविनाश जाधव, स्थापत्य अभियंता | डॉ.भगवान खाडे, उपमुख्याधिकारी यांचे अधिनस्थ अधिकारी व कर्मचारी<br>1) श्री.योगेश साळुंखे, प्रशासकीय अधिकारी<br>2) श्री.आकाश आटाळे, सहायक नगररचनाकार<br>3) श्री.सचिन गिड्डे, उपलेखापाल<br>4) श्री.कमलेश रविढोणे, लेखापाल<br>5) श्रीमती स्वप्नाली पाटील, विद्युत अभियंता<br>6) श्री.अजिंक्य वाळवेकर<br>7) श्री.विनोद गुरंम, लिपिक<br>8) श्री.संदीप कुचीवाले, लिपिक<br>9) श्री.अधिक इंगळे, मुकादम<br>10) श्री.रणजीत होगले, शिपाई<br>11) सर्वश्री आनंदा कांबळे, रोहित कांबळे, मोहन हाळकी, राजाराम कांबळे, राकेश कांबळे, मुकादम, आरोग्य विभाग |
| 3<br>4 | श्री.प्रसाद पळसे, लिपिक<br>श्री.अनिल वसंत कांबळे, सहायक<br>श्री.प्रताप मदने, सहायक | श्री.पंकज थोरात, संगणक अभियंता | |
| 5<br>6 | श्री.अरुण जाधव, लिपिक<br>श्री.प्रवीण पाटील, सहायक | श्री.प्रतिक निकम, पाणीपुरवठा अभियंता | |
| 7<br>8 | श्री.रणजीत जाधव, लिपिक<br>श्री.अनिल जयवंत कांबळे, सहायक | श्री.मुबीन नदाफ, स्थापत्य अभियंता | |
| 9<br>10<br>11 | निखिल पवार, लिपिक<br>श्री.अनिल मोरे, लिपिक<br>श्री.राजेंद्र गुजले, लिपिक<br>श्री.गणेश मद्रासी, सहायक | श्री.मोहन माळी, सहायक कार्यालय अधीक्षक | |

02. **क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी /कर्मचारी यांचे कामाचे स्वरूप व जबाबदारी पुढीलप्रमाणे -**

1) **भाग लिपिक** - नेमून दिलेल्या भागात व त्यामधील समाविष्ठ क्षेत्रामध्ये दररोज सकाळी 10.00 ते 11.00 या कालावधीत फिरती करून भागात कोठेही अनधिकृत /विनापरवानगी तात्पुरते फलक, जाहिराती, बॅनर इ. प्रदर्शित होणार नाहीत, याची खातरजमा करणे. तसे आढळून आल्यास संबंधितानी परवानगी घेतली आहे अगर कसे? याची पडताळणी करून सविस्तर अहवाल क्षेत्रीय अधिकारी यांचेमार्फत नोडल अधिकारी यांचेकडे सादर करणेत यावा. भाग लिपिक यांनी केलेल्या कार्यवाहीचे फोटो अथवा व्हिडीओ काढावे व जप्त केलेल्या डिजिटल बोर्डांची संख्या **स्वतंत्र रजिस्टर** मध्ये नोंदवून ठेवावी.

2) **क्षेत्रीय अधिकारी** - नेमून देणेत आलेल्या भागातील अधिनस्थ भाग लिपिकांवर नियंत्रण व पर्यवेक्षण करणे. नेमून दिलेल्या भागात व त्यामधील समाविष्ठ क्षेत्रामध्ये आठवड्यातून किमान दोन वेळेस



तक्रारी करिता Toll free क्रमांक - 1800-233-2379
- 02342 222023
whatsapp द्वारे तक्रारी करिता - 9405098910

Scanned by CamScanner

फिरती करून भागात कोठेही अनधिकृत /विनापरवानगी तात्पुरते फलक, जाहिराती, बॅनर इ. प्रदर्शित झालेले नाहीत, याची खातरजमा करणे. तसे आढळून आल्यास संबंधितांनी परवानगी घेतली आहे अगर कसे? याची भाग लिपिकांमार्फत पडताळणी करून सविस्तर अहवाल नोडल अधिकारी यांचेकडे सादर करणेत यावा. संबंधित भाग लिपिक यांना नेमून दिलेल्या भागात जर अनधिकृत /विनापरवानगी तात्पुरते फलक, जाहिराती, बॅनर इ. प्रदर्शित झाल्याचे आढळून आल्यास संबंधित लिपिक यांनी त्याच्या कर्तव्यात कसूर केला असे गृहीत धरुन त्यांचेवर कारवाईचा प्रस्ताव मुख्याधिकारी यांचेकडे सादर करणे.

3) **भरारी पथक** - अनधिकृत /विनापरवानगी तात्पुरते फलक, जाहिराती, बॅनर इ. प्रदर्शित झाले असल्याचे नोडल अधिकारी यांचेमार्फत निदर्शनास आल्यास तात्काळ निष्कासनाची कार्यवाही करणेकामी मनुष्यबळ व यंत्रणा उपलब्ध करून देणे. तसेच सदर कारवाईच्या दरम्यान त्या ठिकाणी उपस्थित राहणे व निष्काषनाची कार्यवाही करणे. संबंधित भाग लिपिक व क्षेत्रीय अधिकारी यांना नेमून दिलेल्या भागात जर अनधिकृत /विनापरवानगी तात्पुरते फलक, जाहिराती, बॅनर इ. प्रदर्शित झाल्याचे आढळून आल्यास संबंधित लिपिक व क्षेत्रीय अधिकारी यांनी त्याच्या कर्तव्यात कसूर केला असे गृहीत धरुन त्यांचेवर कारवाईचा प्रस्ताव मुख्याधिकारी यांचेकडे सादर करणे.

4) **नोडल अधिकारी** - PIL 155/2011 च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाकडील मार्गदर्शक तत्वे व इस्लामपूर नगरपरिषद जाहिरात धोरण 2023 नुसार सर्व जाहिराती परवानगी विषयक कामे करणे, वरिष्ठ कार्यालयाकडील आदेश, निर्देश, परिपत्रके व शासन निर्णय यानुसार कार्यवाही करणे, त्यानुषंगाने वरिष्ठ कार्यालयास माहिती पाठविणे. नोडल अधिकारी यांनी आवश्यकता भासल्यास पोलीस बंदोबस्त घेणेची कार्यवाही करावी. आठवड्यातून एकदा नोंदीचे रजिस्टर पडताळणे करणे.

5) **वाहन विभाग प्रमुख** - अनधिकृत /विनापरवानगी होर्डीग्ज, आकाशचिन्हे, फ्लेक्स, तात्पुरते फलक, जाहिराती, बॅनर निष्कासन कारवाईकरिता वाहन उपलब्ध करून द्यावे.

**03. इस्लामपूर नगरपरिषदेच्या हद्दीतील सार्वजनिक व शासकीय इमारत /जागेवर, खाजगी इमारत /जागेवर उंच लोखंडी मनोरे, मोबाईल टॉवर, उंच लोखंडी ढाचे यांचेवर अनधिकृत /विनापरवाना आकाश चिन्हे, होर्डिंग, पोस्टर, कमानी, जाहिराती आढळून आल्यास नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी यांच्याशी समन्वय साधून Geo tagged फोटो काढणे, पंचनामा करणे, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने संबंधितांना महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, 1995 मधील तरतूदींनुसार दंड व FIR बाबत अवगत करणे व तदअनुषंगिक पुढील कार्यवाही करणे.**

**तसेच नगरपरिषद हद्दीत अनधिकृत /विनापरवाना आकाश चिन्हे, होर्डिंग, पोस्टर, कमानी, जाहिराती आढळून आल्यास महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, 1995 मधील तरतूदींनुसार दंडात्मक कार्यवाही करणेसाठी व पोलीस स्टेशन, इस्लामपूर येथे FIR दाखल करणेसाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद यांचे वतीने संबंधित भाग लिपिक व क्षेत्रीय अधिकारी यांना प्राधिकृत करणेत येत आहे.**

*04. PIL 155/2011* अंतर्गत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे कोणतेही उल्लंघन झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित भाग लिपिक, क्षेत्रीय अधिकारी, भरारी पथक, नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी यांची राहील, याची स्पष्ट नोंद घ्यावी. यापूर्वीचे आदेश क्र. जा.क्र. /इनपा /कार्या 6 /5501 /बॅनर कारवाई /2023, दि.29/11/2023 रद्द समजणेत यावे.

(राहुल मर्ढेकर)
मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद, जिल्हा सांगली.

प्रति - उपरोक्त नमुद अधिकारी व कर्मचारी (सर्व) इस्लामपूर नगरपरिषद, जि.सांगली.

प्रत माहितीस्तव - मा.पोलीस निरीक्षक, इस्लामपूर पोलीस स्टेशन.

Scanned by CamScanner